Bharatiya Vidya Bhavan's

# Sardar Patel College of Engineering

Munshi Nagar, Andheri (West), Mumbai - 400 058

Ref. No. PO/OW/2020/29 Date : 16/03/2020

# CIRCULAR

As per Letter No. २/विकामुं/तंशि/आस्था-२/२०२०/९५४, दिनांक १४ मार्च २०२० received from the Office of Jt. Director, Technical Education, Maharashtra State related to spread of coronavirus (COVID-19) and University of Mumbai Circular (REG/ICC/2019-20/24), dated 15th March 2020 the academic (lectures/practical's/tutorials) activities of the institute are to be suspended till Tuesday the 31st March 2020. However, day to day administrative work and other activities shall continue. Government orders, if any, in this regard will be communicated from time to time.

Further Faculty Members and Supporting Staff are instructed that there is no compulsion by the institution in any regard and they should analyze the situation, look at the personal constraints/needs and take appropriate decisions at their level in this regards.

Faculty members and supporting staff are hereby informed that they can adjust their vacation slot during the summer vacation of 2020 if they remain absent for the period 16th March 2020 to 31st March 2020 in consultation with their respective Head of Department. Faculty Members and Supporting Staff not entitled for vacation should apply for leave for the period they remain absent.

**Please note that any updates from competent authority related to above matter will be updated on institute website.**

**I/c. PRINCIPAL**

c.c. to : Head : Civil/Elect/Mech/First Year/CoE/PG Coordinator/TPO/Library/Office Registrar/BKS Office/Chairperson (Student Welfare Committee)

y:\khot shridhar\2020\circulars\circular national anthem.docx

फोन नं.२६४७ ४८९२
टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.com

महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व), मुंबई ५१.

क्र. २/विकामुं/तंशि/आस्था-२/२०२०/९५४ दिनांक :१४/०३/२०२०

**अत्यंत तातडीचे**

प्रति,
मा. संचालक/कुलसचिव/प्राचार्य
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित
पदवी, पदविका व पदव्युत्तर सर्व अभ्यासक्रमाच्या संस्था

**विषय - राज्यात करोना विषाणु (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.**

संदर्भ - १. शासन पत्र सर्वजनिक आरोग्य विभाग क्र. करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, , दि. १४.०३.२०२०
२. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग,क्र.संकीर्ण २०२०(सं.क्र.(४०९/२०)/तांशि-१ दिनांक १४.०३.२०२०
३. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०२०/१४८ दिनांक १४.०३.२०२०

शासनाने करोना विषाणूचा **(कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक** १३ मार्च २०२० पासून लागु करुन खंड २,३ व ४ मधील तरतूदी नुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्या नुसार करोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणुन सर्व महानगर पालिका, सर्व नगर पालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसचे महाविद्यालये व आयुक्त,व्यवसाय व प्रशिक्षण केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीतील तरतूदी नुसार दि. ३१ मार्च २०२० पर्यत बंद ठेवण्याबाबत संदर्भाधिन १ व २ च्या शासन पत्रान्वये सूचित केलेले आहे (शासन पत्राची प्रत सोबत जोडली आहे)

तथापी या सर्व महानगर पालिका, नगर पालिका व नगरपंचायत क्षेत्रातील इयत्ता १० व १२ वीच्या परिक्षा तसेच विश्वविद्यालयाच्या प्रात्यक्षीके व परिक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आल्याचे शासनाने संदर्भाधिन पत्रान्वये कळविले आहे. त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना देखील संदर्भाधिन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने, या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित पदवी, पदविका व पदव्युत्तर सर्व अभ्यासक्रमाच्या संस्थांप्रमुखांना कळविण्यात येते की, आपली संस्था दि.३१ मार्च २०२० पर्यत बंद ठेवण्यात यावी तसेच शासन पत्र व संचालक कार्यालयाच्या निर्देशाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

(जे.आर. निखाडे)
सहाय्यक संचालक (ता),
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई

प्रति,

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई
२. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण, मंडळ बांद्रा (पू.) मुंबई -५१
३. मा. सचिव, तंत्रशिक्षण परीक्षा मंडळ, बांद्रा (पू.) मुंबई -५१

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

अत्यंत तातडीचे

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२०/१४८ दिनांक : १४ मार्च,२०२०

प्रति,
१)सर्व सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर,

२)संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई

विषय :- राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत....

संदर्भ : १. शासन पत्र सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक करोना-२०२०/ प.क्र.५८/आरोग्य ५, दिनांक १४.३.२०२०
२. शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण २०२०/(सं क्र (४०९/२०)/तांशि-१,दिनांक १४.३.२०२०

शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दिनांक १३.३.२०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्यानुसार करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यावसाय व प्रशिक्षण केंद्र यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था , साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावलीमधील तरतूदीनुसार दिनांक ३१ मार्च,२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भाधीन १ च्या शासन पत्रान्वये सूचित केले आहे. ( शासन पत्राची प्रत सोबत जोडली आहे)

तथापि या सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी १२ वी च्या परीक्षा तसेच विश्वविद्यालयाच्या प्रात्यक्षिके व परीक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आल्याचे शासनाने संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे. तसेच आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचनादेखील संदर्भाधीन पत्रान्वयवे देण्यात आल्या आहेत.

त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, उपरोक्त सूचना विचारात घेऊन आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत व्यावसायिक पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था दिनांक ३१.३.२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबतच्या सूचना संस्थाप्रमुखांना तात्काळ निर्गमित करण्यात याव्यात व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.

( प्रमोद.अ.नाईक )
सहसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

E:\Budage\2020-21\General Correspondence\Circular regarding close institute upto 31.3.2020.docx

महाराष्ट्र शासन

<u>अत्यंत तातडीचे</u>

क्रमांक : संकिर्ण-२०२०/(सं.क्र.(४०९/२०)/तांशि-१
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०००३२.
दि. १४ मार्च, २०२०.

प्रति,
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय /कला संचालनालय,
महाराष्ट्र राज्य ,
मुंबई - ४००००१.

विषय : राज्यात करोना विषाणू (कोव्हीड-१९) चा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत.

संदर्भ : सार्वजनिक आरोग्य विभाग, पत्र क्र. करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५, दि.१४/०३/२०२०.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे सोबत जोडलेले संदर्भाधिन पत्र कृपया पहावे.

०२. शासनाने करोना विषाणूचा (कोव्हीड-१९) प्रादूर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७, दि.१३/०३/२०२० पासून लागू करुन खंड-२, ३ व ४ मधील तरतुदींनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

३. करोना विषाणूचा होणारा प्रादूर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका,सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था, साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदींनुसार दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत संदर्भाधिन पत्राव्दारे सूचित करण्यात आले आहे.

४. तथापि या सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील इयत्ता १० वी , इयत्ता १२ वी तसेच विश्वविद्यालयांची प्रात्यक्षिके व परीक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला आहे.तसेच आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही, यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना देखील संदर्भाधिन पत्रान्वये देण्यात आल्या आहेत.

५. त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की,उपरोक्त सूचना विचारात घेऊन तंत्रशिक्षण संचालनालयाच्या व कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी/अनुदानित/खाजगी शैक्षणिक संस्था/महाविद्यालये दि.३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत आपल्या स्तरावरुन सर्व संस्थाप्रमुखांना तात्काळ सूचित करण्यात यावे व त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

(सतीश ज. तिडके)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

## महाराष्ट्र शासन

अत्यंत तातडीचे

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉम्प्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
दिनांक- १४ मार्च २०२०

प्रति,

अपर मुख्य सचिव
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव, उच्च व तंत्रशिक्षण
मंत्रालय, मुंबई

आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण, पुणे
संचालक, शालेय शिक्षण, पुणे / उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई

विषय: राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत..

शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावलीही तयार करण्यात आली असून स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यात येत आहे.

करोना विषाणुचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगर पंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी शाळा तसेच महाविद्यालये व आयुक्त, व्यवसाय व प्रशिक्षण केंद्रे यांच्या आस्थापनेवरील शैक्षणिक संस्था साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने दिनांक ३१ मार्च २०२० पर्यत बंद ठेवण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात येत आहे.

तथापि, या सर्व महानगरपालिका, नगरपालिका व नगर पंचायत क्षेत्रातील १० व १२ च्या परिक्षा तसेच विश्वविद्यालयाच्या परिक्षा विहीत वेळापत्रकानुसार घेण्यात याव्या असाही निर्णय घेण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना संबंधीत संस्था प्रमुखास देण्यात याव्यात.

तरी उपरोक्तनुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील सर्व आस्थापनांना सूचित करण्यात यावे त्याबाबतचा अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

प्रदीप व्यास

( डॉ. प्रदीप व्यास)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत विभागीय आयुक्त, (सर्व)
प्रत प्रधान सचिव (नगरविकास - २) मंत्रालय, मुंबई
प्रत आयुक्त, महानगरपालिका, (सर्व)

मुंबई विद्यापीठ

परिपत्रक

(REG/ICC/2019-20/24)

दि.१५ मार्च, २०२०

**विषय- राज्यात कोरोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत**

**संदर्भ- १) शासनपत्र क्र. संकीर्ण-२०२० / (सं.क्र.) / (११४/२०) विशि-१, दिनांक १४ मार्च, २०२०**

**२) शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) यांचे क्र. उशिसं/ करोना/ मवि-१/२०२०/३७७८**

उपरोक्त विषयाच्या व संदर्भाधीन पत्रांच्या अनुषंगाने शासनाने कोरोना विषाणूचा ( कोव्हिड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत अधिसूचना निर्गमित केली आहे. अधिसूचनेतील उपाययोजनेचा भाग म्हणून उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका व सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी/अनुदानिक/ खाजगी शैक्षणिक संस्था/महाविद्यालये/ अकृषी विद्यापीठे दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापी विद्यापीठांनी प्रात्यक्षिके व परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घेण्यात याव्यात असाही निर्णय घेण्यात आला आहे. तसेच आजारी विद्यार्थी इतर विद्यार्थ्यांच्या संपर्कात येणार नाही, यासाठी आवश्यक ती दक्षता व खबरदारी घेण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत.

या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येत आहे की मुंबई विद्यापीठाशी सलंग्नित सर्व महाविद्यालये, विद्यापीठ उपपरिसरे, आदर्श महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था, सर्व शैक्षणिक विभाग यांनी प्रात्यक्षिके व परीक्षा विहित वेळापत्रकानुसार घ्याव्यात. परीक्षेच्या कामाशिवाय विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात /शैक्षणिक विभागात/ विद्यापीठात आणि सार्वजनिक/ गर्दीच्या ठिकाणी जाण्याचे टाळावे. तद्वतच यासंदर्भात सर्व महाविद्यालये, विभागप्रमुख, संचालकांनी देखील सर्वोतोपरी खबरदारी घ्यावी. तसेच कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी आवश्यक सर्व सूचनांचे /प्रतिबंधात्मक उपायांचे काटेकोरपणे पालन करावे. वसतिगृहात वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांनी स्वतःच्या सुरक्षिततेसंदर्भात आवश्यक ती सर्व खबरदारी घ्यावी. ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा या कालावधी दरम्यान नाही असे विद्यार्थी वसतिगृह अधीक्षकांच्या अनुमतीने आपल्या मूळ गावी जाऊ शकतात. अत्यावश्यक परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांनी बाहेर पडताना स्वतःचे ओळखपत्र सोबत बाळगावे.

पुढे असेही कळविण्यात येते की उदभवलेल्या परिस्थितीमध्ये फक्त नियमित अध्यापनाचे कार्य बंद ठेवण्यात येईल, तथापि सर्व प्रशासकीय व इतर शैक्षणिक कामकाज नियमित सुरू राहील. याबाबत शासनाकडून सुधारीत आदेश प्राप्त झाल्यास सर्व संबंधितांना त्याबाबत कळविण्यात यईल.

(डॉ. अजय देशमुख)

कुलसचिव